# जाहिर निवेदन

महिला व बालविकास विभागाअंतर्गत शिक्षक (वेतनश्रेणी ५२०० -२०२०० ग्रेड पे २४००) या संवर्गात रिक्त असलेली सरळसेवा कोटयातील पदे भरण्यासंबधी विभागामार्फत दिनांक २५-२-२०१४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तथापी शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य ,पुणे -१ यांनी त्यांचे पत्र क्र प्राशिसं/२०१४/टी.ई.टीपरिक्षा/ड-५०२/४९७७ दि.१५-९-२०१४ अन्वये आर.टी.ई ॲक्ट २००९ कलम २३ नुसार व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र आरटीई२०१०/प्र.क्र.५७२/प्राशि-१ दि १३-२-२०१३ नुसार शिक्षक संवर्गात नविन नियुक्तीसाठी उमेदवाराने शिक्षक पात्रता परिक्षा (Teachers Eligibility Test) ६०% गुणांसह उत्तीर्ण होणे अनिवार्य असल्याने शिक्षक या पदासाठी दि.२५-२-२०१४ रोजी दिलेल्या जाहिराती मध्ये बदल करण्याबाबत सुचित केलेले आहे.

तसेच महिला व बालविकास विभाग ,मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र मबाआ -२०१४/प्र.क्र१०९/का-७ दिनांक १८-७-२०१४ अन्वये या विभागाकडील शिक्षक पदासाठी शिक्षक पात्रता परिक्षा (Teachers Eligibility Test) ६०% गुणांसह उत्तीर्ण होण्याची शालेय शिक्षण क्रिडा विभाग शासन निर्णय दि.१३-०२-२०१३ मधील तरतुद महिला व बालविकास विभागाकडील शिक्षक पदभरतीसाठी लागु असल्याचे कळविलेले आहे.

त्यामुळे शिक्षक संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दि.२५-२-२०१४ रोजी प्रसिध्द केलेली जाहिरात व त्याअनुषंगाने घेण्यात आलेली लेखी परिक्षा मुळ जाहिरातीमधील परिच्छेद क्र ३ नुसार आयुक्त,महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य, पुणे हे रदद करीत आहेत.

शिक्षक या संवर्गातील रिक्त पदे सुधारीत अटी , शर्ती व नियमानुसार भरण्याबाबतची जाहिरात नव्याने प्रसिध्द करण्यात येत आहे .

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य पुणे

29/1/2015